Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३१] गुरुवार ते बुधवार, जुलै ३१-ऑगस्ट ६, २०२५/श्रावण ९-१५, शके १९४७ [पृष्ठे १९, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	नाही.
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-१९
भाग एक-अ.—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१-१२

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ५८८.

जिल्हाधिकारी, यांजकडून

संदर्भ :- (१) उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि. का., बुलढाणा यांचे कार्यालयाचे पत्र जावक क्रमांक भूसंपादन (लसिंका) म.स.-कावि-२८६-२०२५, दिनांक ३० जून, २०२५.

(२) कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव यांच्या कार्यालयाचे पत्र जा.क्र. २२१३-भोन गावठाण-रेचिशा-२०२५, दिनांक २३ जून, २०२५.

(३) या कार्यालयाचे आदेश क्रमांक कावि-सअभूसं-कक्ष ७-२-९७९-२०२५, दिनांक ०१ जुलै, २०२५.

(४) उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि. का., बुलढाणा यांचे कार्यालयाचे पत्र जावक क्रमांक भूसंपादन (लसिंका) म.स.-कावि-२९९-२०२५, दिनांक ११ जुलै, २०२५.

जिगांव प्रकल्पांतर्गत भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-२०२१-२०२२, मौजे भोन (जुने गावठाण), ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा या प्रकरणात (सहा) ०६ महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत

सुधारित आदेश

क्रमांक कावि-सअभूसं-कक्ष ७-२-९७९-२०२५.—

उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि. का., बुलढाणा यांनी भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-२०२१-२०२२, मौजे भोन (जुने गावठाण), ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा (क्षेत्र-४५५९१.०६ चौ.मी. कलम १९ नुसार) प्रकरणामध्ये कलम १९ च्या अधिसूचनेस दिनांक ०८ जानेवारी, २०२४ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकरणचा व्यपगत दिनांक ३० जानेवारी, २०२५ होता. तद्नंतर जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक ३० डिसेंबर, २०२४ अन्वये उक्त प्रकरणास सहा (०६) महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. (या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्रमांक-३, दिनांक ०१ जुलै, २०२५ मध्ये टंकलेखन दोषामुळे अनावधानाने ३१ डिसेंबर, २०२५ झाले होते. **त्या ऐवजी** ३१ डिसेंबर, २०२४ असे वाचावे.) त्यानुसार सदर प्रकरण दिनांक ३० जुलै, २०२५ रोजी व्यपगत होत आहे. सदर प्रकरणात संदर्भीय पत्र क्रमांक (२) कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव यांनी प्रकरणातील मालमत्तेचे मूल्यांकन तयार करून तांत्रिक मान्यतेकरीता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे कडे सादर केले असून प्रकरणात आवश्यक असलेल्या निधीची मागणी केलेली असून निधी प्राप्त होण्यास साधारणतः (सहा) ०६ महिन्यांचा कालावधी लागणार असल्यामुळे भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-२०२१-२०२२, मौजे भोन, ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा (जुने गावठाण) सदर भूसंपादन प्रकरण व्यपगत होऊ नये याकरीता कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव तसेच उपजिल्हाधिकारी, ल.सिं.का., जि. का., बुलढाणा यांनी प्रारूप निवाड्याची कार्यवाही करिता (सहा) ०६ महिने मुदतवाढ मिळणेबाबत देण्यात यावी अशी संदर्भीय पत्र अन्वये विनंती केली आहे.

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ नुसार जेव्हा प्राथमिक सूचनेच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या कालावधीत कोणतीही घोषणा प्रसिध्द केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

परंतु, या कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजतांना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेली कोणतीही स्थगितीमुळे किंवा मनाई हुकूमामुळे जमीन संपादनाची कार्यवाही थांबलेली होती असा कोणताही कालावधी वगळण्यात येईल किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु आणखी असे की, समूचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, अशी तरतूद आहे.

त्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ नूसार भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-२०२१-२०२२, मौजे भोन (जुने गावठाण), ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा (क्षेत्र - ४५५९१.०६ चौ. मी. कलम १९ नुसार) या भूसंपादन प्रकरणास निवाडा घोषित करण्यास ०६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

दिनांक १४ जुलै, २०२५.

———————

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५८९.

संदर्भ :-(१) उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि. का., बुलढाणा यांचे कार्यालयाचे पत्र जावक क्रमांक कावि-म.स.-भूसंपादन (लसिंका)-३०७-२०२५, दिनांक १५ जुलै, २०२५.

(२) कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांच्या कार्यालयाचे पत्र जा. क्र. ३०१८-जि.प्र.-भू.सं.-रेचिशा-१-दादगांव- मुदतवाढ-२०२५, दिनांक १४ जुलै, २०२५.

जिगांव प्रकल्पांतर्गत भूसंपादन प्रकरण क्रमांक ४३-२००८-२००९, मौजे दादगांव (बुडीत क्षेत्र), ता. नांदुरा, जि. बुलढाणा या प्रकरणात कलम १९ ची कार्यवाहीकरिता ०६ (सहा) महिने मुदतवाढ मिळणेबाबत

आदेश

क्रमांक कावि-सअभूसं-कक्ष ७-२-१००३-२०२५.—

उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का, जि. का., बुलढाणा यांनी भूसंपादन प्रकरण क्रमांक ४३-२००८-२००९, मौजे दादगांव (बुडीत क्षेत्र), ता. नांदुरा, जि. बुलढाणा (क्षेत्र-३३७.६० हे. आर कलम ११ (१) नुसार) या प्रकरणामध्ये कलम ११ ची अधिसूचनेस दिनांक २९ जून, २०२१ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रारंभिक अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी अंतिमरित्या प्रसिध्द

करण्यात आली असून त्यानुसार प्रकरणाचा व्यपगत दिनांक २७ जुलै, २०२२ होत असल्यामुळे जिल्हाधिकारी यांचे अनुक्रमे आदेश दिनांक २५ जुलै, २०२२, २७ जानेवारी, २०२३, २१ जुलै, २०२३, १९ जून, २०२४, २५ जुलै, २०२४ व १४ जानेवारी, २०२५ अन्वये एकूण ६ वेळा ३६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यपगत दिनांक- २७ जुलै, २०२५ आहे.

कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांनी पुनश्च उक्त प्रकरणामध्ये त्यांचे संदर्भीय पत्र क्रमांक (२) अन्वये प्रकरणातील मालमत्तांची मोजणी व कृषी मूल्यांकन बाकी असल्यामुळे तसेच निधी मागणी महामंडळाकडे सादर करण्यात आली असून निधी प्राप्त होण्यास साधारणतः (सहा) ०६ महिन्याचा कालावधी लागणार असल्यामुळे भूसंपादन प्रकरण क्रमांक ४३-२००८-२००९, मौजे दादगांव (बुडीत क्षेत्र), ता. नांदुरा , जि. बुलढाणा सदर भूसंपादन प्रकरण व्यपगत होऊ नये या करीता कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव तसेच उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि.का., बुलढाणा यांनी उक्त प्रकरणात कलम १९ (१) ची उद्घोषणा घोषित करण्यास (सहा) ०६ महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत देण्यात यावी अशी संदर्भीय पत्र (१) व (२) अन्वये विनंती केली आहे.

उक्त प्रकरणात निधीसाठी प्रदिर्घ कालावधी लोटूनही आजपावेतो प्रकरणात आवश्यक निधी कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांनी उपलब्ध न करून दिल्यामुळे होणाऱ्या विलंबामुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भूर्दंड निर्माण होत असल्यामुळे कार्यान्वयीन यंत्रणा हे जबाबदार राहतील असे उपजिल्हाधिकारी भूसंपादन, ल.सिं.का., जि.का., बुलढाणा यांनी त्यांचे संदर्भीय पत्रान्वये कळविले.

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (७) नुसार जेव्हा प्राथमिक सूचनेच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या कालावधीत कोणतीही घोषणा प्रसिध्द केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

परंतु, या कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजतांना, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेली कोणतीही स्थगितीमुळे किंवा मनाई हुकूमामुळे जमीन संपादनाची कार्यवाही थांबलेली होती असा कोणताही कालावधी वगळण्यात येईल किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु आणखी असे की, समूचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, अशी तरतूद आहे.

त्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (७) नुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक ४३-२००८-२००९, मौजे दादगांव (बुडीत क्षेत्र), ता. नांदुरा, जि. बुलढाणा या भूसंपादन प्रकरणात कलम १९ (१) ची अधिसूचना घोषित करण्यास ०६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

बुलढाणा :
दिनांक १६ जुलै, २०२५.

डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, बुलढाणा.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९०.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ११ अन्वये प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक म.अ.-विभूसंअ.(अवप्र)क्र.२-कावि-१२१-२०२५.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.-७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची - एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची - दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) चे तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची - तीनमध्ये दिलेली आहे. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ मधील पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकारी यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश, " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समूचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

तसेच, मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे परिपत्र क्रमांक अ.का.-प्र.अ.-भूसंपादन-कावि-३१८-२०२५, दिनांक ०८ जुलै, २०२५ अन्वये भूसंपादन प्रस्तावाशी निगडीत कलम ११ अधिसूचनेची कार्यवाही संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरून करण्याकरीता आदेशित करण्यात आले आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०८-४७-२०२२-२०२३, गाव - राजुरा, तालुका चांदुर बाजार, जिल्हा अमरावती.

अ. क्र.	सर्व्हे नंबर /गट नंबर	अंदाजित क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	७४/४	० ३०
२	७३/१ ब पैकी	० १६
३	७३/१ ब पैकी	० ०९
४	७३/२	० ०३
	एकूण क्षेत्र . .	० ५८

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	मौजा राजुरा येथील पुच्छ कालव्याकरीता.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:-	मौजा राजुरा येथील पुच्छ कालव्याकरीता.
समाजाला मिळणारे लाभ	:-	मौजा राजुरा येथील पुच्छ कालव्याच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगात फायदा व रोजगार निर्मिती ईत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहेत.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

- निरंक -

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती - निरंक -

अनुसूची - चार

सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ मधील अधिसूचना अन्वये सूट देण्यात आली आहे.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम	:-	प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही
(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता	:-	- निरंक -
(क) ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील	:-	- निरंक -

टीप : - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

प्रसन्नजीत चव्हाण,

अमरावती : उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),

दिनांक १७ जुलै, २०२५. अपर वर्धा प्रकल्प, लाभक्षेत्र क्र. २, अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९१.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ चे घोषणापत्र

क्रमांक महसूल सहायक-भूसंपादन-कावि-१८६-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या कलम पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्र. १३२-२०२५, दिनांक १० मार्च, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेले अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन

केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम १५ (१) अन्वये कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्याने, प्रकरणात कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये चा अहवाल निरंक असल्यामुळे (कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर) उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम तीन च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, दर्यापूर यांना पदनिर्देशित करीत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी परिपत्रक क्रमांक अका-प्र.अ.-भूसंपादन-कावि-३१८-२०२५, दिनांक ०८ जुलै, २०२५ अन्वये भूसंपादन अधिनियम, २०१३ व त्याअनुषंगाने प्रसिद्ध नियम, २०१४ मधील तरतुदी प्रमाणे भूसंपादन प्रक्रिया पार पाडताना समूचित शासनाचे वतीने जिल्ह्यामधील सर्व उपविभागीय अधिकारी व भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या वतीने प्राधिकृत करण्यात येते. त्यामुळे यापुढे भूसंपादन प्रस्तावाशी संबंधित कलम ११ अधिसूचना, कलम १९ अधिसूचना व प्रारुप निवाडा मंजुरी इत्यादी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे न पाठविता आपले स्तरावर कार्यवाही करुन निवाड्यासह भूसंपादनाची पूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात यावी, असे निर्देशित केलेले आहे.

अनुसूची-एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-४७-२०२३-२०२४, मौजा - रंगारवासणी, तालुका - अचलपूर, जिल्हा - अमरावती.

अ. क्र.	सर्व्हे / गट नंबर	अंदाजे क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	३	० २३
२	४	० १२
	एकूण क्षेत्र . .	० ३५

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	चंद्रभागा बॅरेज प्रकल्प, बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:-	चंद्रभागा बॅरेज प्रकल्प, बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता.
सामाजिक मिळणारे लाभ	:-	चंद्रभागा बॅरेज प्रकल्प, बुडीत क्षेत्राच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती - निरंक -

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधित होत नाहीत. सबब, विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

राजेश्वर हांडे,
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी,
दर्यापूर.

दर्यापूर :
दिनांक १४ जुलै, २०२५.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९२.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ चे घोषणापत्र

क्रमांक-सहा.मह.अधि.-भूसंपादन-कावि-२२६-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या कलम पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्र. २०१, दिनांक २३ एप्रिल, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे, आणि त्याद्वारे, असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धारणी, ता. धारणी, जि. अमरावती यांना पदनिर्देशित केलेले आहे.

अनुसूची-एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-४७-२०२३-२०२४, गाव - बागलिंगा, तालुका - चिखलदरा, जिल्हा - अमरावती.

अ. क्र.	भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक (सं.मो. प्रमाणे चालता क्रमांक)	संपादित क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	३५	० ०९
२	३६	० १६

अनुसूची - एक—चालू

(१)	(२)	(३)
		हे. आर
३	४० ब	० ९१
४	४२	० ४१
५	४८ पैकी	४ ५३
६	४८ पैकी	० ४५
७	४८ पैकी	० ८१
८	४८ पैकी	० ८१
९	५०	१ ५०
१०	५१ अ	० ५२
११	५१ ब	० ३७
	भूसंपादनाचे एकूण क्षेत्र . .	१० ५६

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- बागलिंगा लघु प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- बागलिंगा लघु प्रकल्पाच्या कामाकरीता.

सामाजिक मिळणारे लाभ :- प्रकल्पामुळे आदिवासी व डोंगराळ भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. तसेच पाणी पातळीत वाढ होऊन सिंचन व पाण्याची समस्या सुटणार आहे. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी, आदिवासी ग्रामस्तांचे पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावून आर्थिक व सामाजिक प्रगतीत सुधारण होणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती - निरंक -

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधित होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

प्रदीप आ. शेवाळे,
उपविभागीय अधिकारी तथा,
भूसंपादन अधिकारी,
धारणी.

धारणी :
दिनांक १६ जुलै, २०२५.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९३.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११ (१) खालील प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक-उविअ-म.स.-भू.स.-भूसंपादन-कावि-३४८-२०२५.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासनाचे महसूल व वनविभागाचे अधिसूचना क्रमांक एमआयएस-११-२०२४ सी आर.७७-ए-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा केला आहे.) भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) चे कलम ३ चे उपबंध (ई) मधील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, उक्त अधिनियमाचे कलम ३ चे उपबंध (ए झेड) नुसार परीभाषित केलेल्या सार्वजणिक प्रयोजनासाठी भूमि संपादनाचे संबंधाने जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या क्षेत्रासाठी अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ह्यांना उक्त अधिनियमाचे उद्देशासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल असे अधिसूचित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन म्हणून जिल्हाधिकारी वाशिम, यांना असे दिसून आले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनी/जमिनींची, (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन/जमिनी" असा केला आहे) यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये त्याच्या स्वरूपाचे विवरण दिले आहे, अश्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे) गरज आहे, किंवा गरज लावण्याचा संभव आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या उपकलम (१) चे तरतुदीनुसार, असे अधिसूचित करण्यात येत आहे की, उक्त जमिनीची/जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी गरज लागण्याचा संभव आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेले आहे. (जर काही विस्थापन असल्यास त्याची कारणे या अधिसूचीमध्ये नमूद करावे.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणामाचे निर्धारणाचा गोषवारा यासोबत जोडण्यात आलेल्या अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४३ मधील उपकलम (१) नुसार पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेसाठी नेमलेल्या प्रशासकाची माहिती यासोबत अनुसूची-पाचमध्ये विनिर्दिष्ट केलेली आहे (जर नियुक्तीची गरज असेल तर या अनुसूचीत तसा तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ११ चे उपकलम (४) अन्वये असे घोषित करण्यात येते की, सदर अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, उक्त अधिनियमाचे प्रकरण-चार खालील प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीने उक्त जमिनीचे/जमिनींचे किंवा तिच्या/त्यांच्या भागांचे कोणत्याही प्रकारे अभिहस्तांतरण करु नये, किंवा कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करू नये ;

परंतु, उक्त जमिनीचे मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिकारी, विशिष्ट परिस्थितीची कारणे लेखी नोंदवून, अशा जमिनीस किंवा तिचे भागास उपरोक्त तरतुदीचे अंमलबजावणी पासून सूट देवू शकतात :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने जाणीवपूर्वक या तरतुदीचे उल्लंघन केले आणि त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा इजा पोहचली असेल, तर त्याबाबत जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

यापुढे असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी, हे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त नियम" असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाचे अद्यावतीकरणाचे काम हाती घेत आहेत व ते कार्य पूर्ण करीत आहेत.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमांचे कलम ३ चे उपबंध (छ) नुसार जिल्हाधिकारी हे समूचित शासन आहेत, म्हणून उक्त अधिनियमांचे अंतर्गत जिल्हाधिकारी, वाशिम यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरुळपीर यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

भूमिचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-४७-२०२४-२५, गाव - घोटा, तालुका - मंगरूळपीर, जिल्हा - वाशिम.

अ. क्र.	सर्वे नंबर / गट नंबर	अंदाजे क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	१६ पैकी	० ०७
२	१६ पैकी	० ५१

अनुसूची - एक—चालू

(१)	(२)	(३)
		हे. आर
३	१६ पैकी	२ ००
४	१६ पैकी	० ८१
५	१६ पैकी	१ १९
६	१६ पैकी	० ५७
७	१६ पैकी	० २२
८	१७ पैकी	० ८९
	एकूण . .	६ २६

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव :- लघुपाटबंधारे विभाग, कारंजा, मौजे घोटा (घोटा शिवणी बॅरेज योजनेच्या बुडीत क्षेत्राकरीता)

प्रकल्पाच्या कामाचा तपशील :- घोटा शिवणी बॅरेज योजनेच्या बुडीत क्षेत्राकरीता.

सामाजिक फायदे :- प्रकल्पाच्या एकूण पाणी साठा ६.०६२ दलघमी आहे. सदर प्रकल्पामुळे मंगरुळपीर तालुक्यातील घोटा, शिवणी, पोघात, उंबरडोह, गणेशपुर, बहादुरपुर ६ गावांमधील १३९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तिचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती - निरंक -

अनुसूची - चार

सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणाऱ्या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) : महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतुदी लागू करण्यापासून सूट प्राप्त.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

(१) ज्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम :- आवश्यकता नाही, सबब माहिती - निरंक -

(२) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता :- - निरंक -

(३) प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनुसार झाली आहे, त्याचा तपशील :- - निरंक -

टीप :- उक्त जमिनीच्या/जमिनींच्या योजनेचे (Plan चे) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरूळपीर यांच्या कार्यालयात निरिक्षण करता येईल.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९४.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११ (१) खालील प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक-उविअ-म.स.-भू.स.-कावि-३५०-२०२५.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासनाचे महसूल व वनविभागाचे अधिसूचना क्रमांक एमआयएस-११-२०२४ सी आर.७७-ए-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा केला आहे.) संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) चे कलम ३ चे उपबंध (ई) मधील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, उक्त अधिनियमाचे कलम ३ चे उपबंध (ए झेड) नुसार परीभाषीत केलेल्या सार्वजणीक प्रयोजनासाठी भूमी संपादनाचे संबंधाने जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या क्षेत्रासाठी अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ह्यांना उक्त अधिनियमाचे उद्देशासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल असे अधिसूचित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन म्हणून जिल्हाधिकारी, वाशिम यांना असे दिसून आले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीत/जमिनींची, (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमिन/जमिनी" असा केला आहे) यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये त्याच्या स्वरूपाचे विवरण दिले आहे, अश्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे) गरज आहे किंवा गरज लागण्याचा संभव आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या उपकलम (१) चे तरतुदीनुसार, असे अधिसूचित करण्यात येत आहे की, उक्त जमिनीची/जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी गरज आहे गरज लावण्याचा संभव आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल आहे. (जर काही विस्थापन असल्यास त्याची कारणे या अनुसूचीमध्ये नमुद करावे.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणामाचे निर्धारणाचा गोषवारा यासोबत जोडण्यात आलेल्या अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४३ मधील उपकलम (१) नुसार पुनर्वसन आणि पुनर्स्थापनेसाठी नेमलेल्या प्रशासकाची माहिती यासोबत अनुसूची-पाचमध्ये विनिर्दिष्ट केलेली आहे (जर नियुक्तीची गरज असेल तर या अनुसूचीत तसा तपशील नमुद करावा) ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ११ चे उपकलम (४) अन्वये असे घोषित करण्यात येते की, सदर अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, उक्त अधिनियमाचे प्रकरण-चारखालील प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीने उक्त जमिनीचे/जमिनींचे किंवा तिच्या/त्यांच्या भागांचे कोणत्याही प्रकारे अभिहस्तांतरन करु नये किंवा कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करू नये ;

परंतु, उक्त जमिनीचे मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिकारी, विशिष्ट परिस्थितीची कारणे लेखी नोंदवून, अशा जमिनीस किंवा तिचे भागास उपरोक्त तरतुदीचे अंमलबजावणी पासून सूट देवू शकतात :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने जाणीवपूर्वक या तरतुदीचे उल्लंघन केले आणि त्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा इजा पोहचली असेल, तर त्याबाबत जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

यापुढे असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमांच्या कलम ११ पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी, हे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त नियम" असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाचे अद्यावतीकरण हाती घेत आहेत व ते कार्य पूर्ण करीत आहेत.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३ चे उपबंध (छ) नुसार जिल्हाधिकारी हे समूचित शासन आहेत, म्हणून उक्त अधिनियमांचे अंतर्गत जिल्हाधिकारी, वाशिम यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरुळपीर यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

भूमिचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ६-४७-२०२४-२५, गाव - घोटा, शिवणी रोड, तालुका - मंगरूळपीर, जिल्हा - वाशिम.

अ. क्र.	सर्वे नंबर / गट नंबर	अंदाजे क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	१३९ पैकी	० ४०
२	१३९ पैकी	० ८१

अनुसूची - एक—चालू

(१)	(२)	(३)
		हे. आर
३	१३९ पैकी	० ५५
४	१३९ पैकी	० ६२
५	१३९ पैकी	० ४४
६	१३९ पैकी	० २८
७	१३९ पैकी	० ७९
८	१३९ पैकी	१ ०२
९	१३९ पैकी	० ९६
१०	१४० पैकी	१ ८९
११	१४० पैकी	१ ८९
१२	१४० पैकी	१ ३२
१३	१४१ पैकी	० ४३
१४	१४१ पैकी	० ४४
१५	१४७ पैकी	० ३२
१६	१४७ पैकी	१ २१
१७	१४६ पैकी	१ ८९
१८	१४९ पैकी	० ०९
	एकूण . .	१५ ३५

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव :- लघुपाटबंधारे विभाग, कारंजा, मौजे शिवणी रोड (घोटा शिवणी बॅरेज योजनेच्या बुडीत क्षेत्राकरीता).

प्रकल्पाच्या कामाचा तपशील :- घोटा शिवणी बॅरेज योजनेच्या बुडीत क्षेत्राकरीता.

सामाजिक फायदे :- प्रकल्पाचा एकूण पाणी साठा ६.०६२ दलघमी आहे. सदर प्रकल्पामुळे मंगरुळपीर तालुक्यातील घोटा, शिवणी, पोघात, उंबरडोह, गणेशपुर, बहादुरपुर ६ गावांमधील १३९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तिचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती - निरंक -

अनुसूची - चार

सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा (सामाजिक परिणामाचे निर्धारण करणाऱ्या यंत्रणेने दिल्याप्रमाणे) : महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतुदी लागू करण्यापासून सूट प्राप्त.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

(१) ज्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम	:-	आवश्यकता नाही, सबब माहिती - निरंक -
(२) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता	:-	- निरंक -
(३) प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसूचनेनुसार झाली आहे, त्याचा तपशील	:-	- निरंक -

टीप :- उक्त जमिनीच्या/जमिनींच्या योजनेचे (Plan चे) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मंगरूळपीर यांच्या कार्यालयात निरिक्षण करता येईल.

राजेंद्र जाधव,

उपविभागीय अधिकारी तथा

भूसंपादन अधिकारी,

मंगरूळपीर.

मंगरूळपीर :

दिनांक १७ जुलै, २०२५.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९५.

जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून

वाचा :-(१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१८-प्र. क्र. १३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ .

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन-सर्व्हे-प्र. क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(३) उप अधीक्षक, भूमि अभिलेख चांदुर बाजार, जिल्हा अमरावती यांचेकडील परिनिरीक्षण प्रस्ताव क्रमांक शिर- घटकदर व परिरक्षण प्रस्ताव-मौजा-सर्फापुर, (५३२०३६)-२०२५-चांदुर बाजार, दिनांक २३ जुन, २०२५, कार्यालयात प्राप्त दिनांक २५ जुन, २०२५, ऑफीस. न. ३५५५८९१२.

अधिसूचना

क्रमांक-शिर-गावठाण-अधिसूचना-परिरक्षण आदेश क्र. २२५-४४८५-२०२५.—

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र. क्र. १३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषगांने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र. क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करुन ड्रोन व्दारे गावठाण भूमापन झालेली गांवे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे/साजाकडे परिरक्षणास देणेबाबत चे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, चांदुर बाजार, यांच्याकडील वाचा क्र. (३) अ नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये साजा परिरक्षण भूमापक, करजगांव, यांचे साजा मध्ये १. मौजा-सर्फापुर (५३२०३६), हे १ गांव नव्याने समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, चांदुर बाजार, या कार्यालयाचे अधिनस्थ साजा परिरक्षण भूमापक करजगांव यांचे साजा मध्ये १. मौजा-सर्फापुर (५३२०३६), हे १ गांव नव्याने समाविष्ट करणेत येत आहे. तसेच, त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून वरील नमूद गांवे परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट-"ब"

उप अधीक्षक, भूमि अभिलेख, चांदुर बाजार यांचे अधिनस्थ साजा परिरक्षण भूमापक करजगांव, मधील समाविष्ट गांवे व मिळकतींचा तपशील

अ.क्र.	जिल्हा	तालुका	कार्यालयाचे नाव	सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध गावे			परिरक्षणास नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती		
				साजा	गांवे	मिळकती	गांवे	मिळकती	साजा	गांवे	मिळकती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)
१	अमरावती	चांदुर बाजार	उप अधीक्षक, भूमि अभिलेख, चांदुर बाजार	परिरक्षण भूमापक, करजगांव	१. करजगांव	३०३९	१. सर्फापुर	२९७	परिरक्षण भूमापक, करजगांव	१. करजगांव	३०३९
					२. शिरजगांव कसबा	२८३०				२. शिरजगांव कसबा	२८३०
					३. थुगाव पिंप्री	६४५				३. थुगाव पिंप्री	६४५
					४. आलमपुर	७७				४. आलमपुर	७७
					५. रतनपुर	१२६				५. रतनपुर	१२६
					६. फाजलापुर	३२५				६. फाजलापुर	३२५
					७. लाखनवाडी	३१६				७. लाखनवाडी	३१६
					८. कोंडवर्धा	३५७				८. कोंडवर्धा	३५७
					९. बोरगाव मोहना	३३९				९. बोरगाव मोहना	३३९
					१०. अमृल्लापुर	२०४				१०. अमृल्लापुर	२०४
					११. सायखेडा	१५२				११. सायखेडा	१५२
					१२. कारंजा बहिरम	५१६				१२. कारंजा बहिरम	५१६
					१३. पाळा	१०६				१३. पाळा	१०६
					१४. कल्होडी	२६८				१४. कल्होडी	२६८
					१५. बेलज	४०१				१५. बेलज	४०१
					१६. पांढरी	१२३				१६. पांढरी	१२३
					१७. गोविंदपुर	३३३				१७. गोविंदपुर	३३३
					१८. निमखेडा	१८१				१८. निमखेडा	१८१
					१९. पिंपरी थुगाव	४३०				१९. पिंपरी थुगाव	४३०
					२०. इनायतपुर	६७				२०. इनायतपुर	६७
										२१. सर्फापुर	२९७
			एकूण . .	२० गावे		१०,८३५	१ गांवे	२९७		२१ गांवे	११,१३२

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करणेची आहे. तसेच वाचा क्र. (३) मध्ये नमूद केलेनुसार १. मौजा-सर्फापुर (५३२०३६), रु. ९९,५०४/- या गावांची सनद फी तात्काळ वसूल करावी.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९६.

वाचा :- (१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१८-प्र. क्र. १३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ .

(२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन-सर्व्हे-प्र. क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(३) उप अधीक्षक, भूमि अभिलेख मोर्शी, जिल्हा अमरावती यांचेकडील परिनिरीक्षण प्रस्ताव क्र.-परिरक्षण प्रस्ताव व घटकदर प्रस्ताव-मौजा-मायवाडी (५३२२५३)-२०२५ मोर्शी दिनांक १७ जुन, २०२५ E ३५६२७५५ का. प्रा दिनांक २७ जुन, २०२५.

अधिसूचना

क्रमांक-शिर-गावठाण-अधिसूचना-परिक्षण आदेश क्र. २२४-४४८८-२०२५.—

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.-संकिर्ण-२०१८-प्र.क्र. १३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर, शासन निर्णयाचे अनुषगांने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भुमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र. ३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करुन ड्रोन व्दारे गावठाण भुमापन झालेली गांवे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे / साजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, उप अधिक्षक, भुमि अभिलेख, मोर्शी, यांचेकडील वाचा क्र. (३) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये साजा परिरक्षण भुमापक, खानापुर, यांचे साजा मध्ये १. मौजा-मायवाडी (५३२२५३), हे १ गांवे नव्याने समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मोर्शी, या कार्यालयाचे अधिनस्थ साजा परिरक्षण भुमापक खानापुर, साजा मध्ये १. मौजा-मायवाडी (५३२२५३), हे १ गांवे नव्याने समाविष्ट करणेत येत आहे. तसेच, त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून वरील नमूद गांवे परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजुरी देणेत येत आहे.

परिशिष्ट-"ब"

उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मोर्शी या कार्यालयाचे अधिनस्थ साजा परिरक्षण भूमापक मोर्शी मधील समाविष्ट गांवे व मिळकतींचा तपशील

अ.क्र.	जिल्हा	तालुका	कार्यालयाचे नाव	सध्या परिरक्षणासाठी उपलब्ध गावे			परिरक्षणास नव्याने घ्यावयाची गावे		पुनर्रचनेनंतरची स्थिती		
				साजा	गांवे	मिळकती	गांवे	मिळकती	साजा	गांवे	मिळकती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)
१	अमरावती	मोर्शी	उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मोर्शी	परिरक्षण भूमापक खानापूर	१. खानापुर	१२२३	१. मायवाडी	१७६	परिरक्षण भूमापक, खानापुर	१. खानापुर	१२२३
					२. अंबाडा	१४५३				२. अंबाडा	१४५३
					३. खेड	८०८				३. खेड	८०८
					४. रिध्दपुर	१२१४				४. रिध्दपुर	१२१४
					५. पाळा	४९७				५. पाळा	४९७
					६. दापोरी	५२२				६. दापोरी	५२२
					७. हिवरखेड	१४८३				७. हिवरखेड	१४८३
					८. चिंचोली गवळी	६४६				८. चिंचोलीगवळी	६४६
					९. उदखेड	५२१				९. उदखेड	५२१
					१०. ममदापुर	६८५				१०. ममदापुर	६८५
					११. रायपुर	४९				११. रायपुर	४९
					१२. भिवकुंडी	२४				१२. भिवकुंडी	२४
					१३. मनीअर्थी	७२				१३. मनीअर्थी	७२
					१४. गणेशपुर	७६				१४. गणेशपुर	७६
					१५. बेलोना	११८				१५. बेलोना	११८
					१६. घोडदेव खु.	८०				१६. घोडदेव खु.	८०
					१७. दहसुर	९३				१७. दहसुर	९३
					१८. धानोरा	११०				१८. धानोरा	११०
					१९. पिंपरी	१५३				१९. पिंपरी	१५३
					२०. सायवाडा	१५१				२०. सायवाडा	१५१
					२१. तरोडा	१९२				२१. तरोडा	१९२
					२२. वऱ्हा	२४२				२२. वऱ्हा	२४२
					२३. आष्टगांव	२६४				२३. आष्टगांव	२६४
					२४. मनिमपूर	१७३				२४. मनिमपूर	१७३
					२५. सालबर्डी	८७				२५. सालबर्डी	८७

परिशिष्ट-ब-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)
					२६. उमरखेड	१५४				२६. उमरखेड	१५४
					२७. भाईपुर	२८१				२७. भाईपुर	२८१
					२८. डोंगर यावली	३५६				२८.डोंगर यावली	३५६
					२९. विष्णोरा	४३८				२९. विष्णोरा	४३८
					३०. लाखारा तळणी	७०				३०. लाखारा तळणी	७०
					३१. चिखल-सावंगी	४१५				३१. चिखल-सावंगी	४१५
										३२. मायवाडी	१७६
			एकूण . .	. .	३१ गावे	१२,६५०	१ गांवे	१७६		३२ गांवे	१२,८२६

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करणेची आहे. तसेच, वाचा क्र. (३) मध्ये नमूद केलेनुसार १. मौजा-मायवाडी (५३२२५३) रु.८६,२८४/-, या गावांची सनद फी तात्काळ वसूल करावी.

अमरावती :
दिनांक ३० जून, २०२५.

महेशकुमार शिंदे,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९७.

वाचा :- (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्हि.सी.आर.-४३२४-स-४-९४ दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर यांचेकडील पत्र क्रमांक-ड्रोन सर्वे-परिरक्षण प्रस्ताव-मौजा शिवणी द, सायखेडा, मंगळसा, रामगाव, पिंपळगाव इजारा, येडशी, मानोली-२०२५, दिनांक ०४ जुलै, २०२५ प्राप्त दिनांक १७ जुलै, २०२५.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश-जा.क्र.८१९-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१-दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर.- ४३२४ स-४-९४-पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिध्द झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे साजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, यांचे मंगरूळपीर यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये साजा प. भू. यामध्ये मौजा शिवणी द, सायखेडा, मंगळसा, रामगाव, पिंपळगाव इजारा, येडशी, मानोली हे ७ गांवे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर या कार्यालयाच्या अधिनस्त साजा न. प. भू. १ यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहे. तसेच, त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजूरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ. क्र.	गावाचे नाव	वसूल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	शिवणी द (५३०८३२)	१४४५८५/- (अक्षरी रक्कम एक लक्ष चौरेचाळीस हजार पाचशे पंच्याऐंशी रुपये)
२	सायखेडा (५३०८१५)	९९३००/- (अक्षरी रक्कम नव्यानव हजार तिनशे रुपये)
३	मंगळसा (५३०७८६)	१४३८९५/- (अक्षरी रक्कम एक लक्ष त्रेचाळीस हजार आठशे पंच्यानव रुपये)
४	रामगाव (५३०८१३)	८१६७०/- (अक्षरी रक्कम एक्यांशी हजार सहाशे सत्तर रुपये)
५	पिंपळगाव इजारा (५३०७८७)	१८९४८०/- (अक्षरी रक्कम एक लक्ष ऐकोणनव्वद हजार चारशे ऐंशी रुपये)
६	येडशी (५३०७२५)	१६९७५०/- (अक्षरी रक्कम एक लक्ष ऐकोणसत्तर हजार सातशे पन्नास रुपये)
७	मानोली (५३०८१०)	१३७६६५/- (अक्षरी रक्कम एक लक्ष सदोतीस हजार सहाशे पासट रुपये)

वाशिम :
दिनांक १० जुलै, २०२५.

श्रीकांत मुंढे,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
वाशिम.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९८.

वाचा :- (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्हि.सी.आर.-४३२४-स-४-९४ दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कारंजा यांचेकडील पत्र क्रमांक-ड्रोन सर्वे-परिरक्षण प्रस्ताव-मौजा-किसान नगर, शिवन बु., मांडवा दिनांक ०९ जुलै, २०२५ प्राप्त दिनांक १८ जुलै, २०२५.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश-जा.क्र.२३५२-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१-दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर.- ४३२४ स-४-९४-पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिध्द झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे साजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, यांचे कारंजा यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये साजा प. भू. यामध्ये मौजा किसान नगर, शिवन बु., मांडवा हे ३ गांवे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कारंजा या कार्यालयाच्या अधिनस्त साजा न. प. भू. १ यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहे. तसेच, त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजूरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ. क्र.	गावाचे नाव	वसूल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	किसान नगर (५३०९८१)	१२८९४०/- (अक्षरी रक्कम एक लक्ष अठ्ठावीस हजार नऊशे चाळीस रुपये)
२	शिवन बु (५३०८४५)	९९१४५/- (अक्षरी रक्कम नव्यानव हजार एकशे पंचेचाळीस रुपये)
३	मांडवा (५३०९८३)	८९३२५/- (अक्षरी रक्कम एकोणनव्वद हजार तिनशे पंचवीस रुपये)

———————

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५९९.

वाचा :- (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्हि.सी.आर.-४३२४-स-४-९४ दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर यांचेकडील पत्र क्रमांक-ड्रोन सर्वे-परिरक्षण प्रस्ताव-मौजा-दस्तापूर व मौजा भडकुंभा दिनांक १७ जुलै, २०२५ प्राप्त दिनांक १८ जुलै, २०२५.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश-जा.क्र.२३५६-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१-दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर.- ४३२४ स-४-९४-पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१ दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिध्द झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे साजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, यांचे मंगरुळपीर यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये साजा प. भू. यामध्ये मौजा मौजा-दस्तापूर व मौजा भडकुंभा हे २ गांवे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरुळपीर या कार्यालयाच्या अधिनस्त साजा न. प. भू. १ यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहे. तसेच, त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजूरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ. क्र.	गावाचे नाव	वसूल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	दस्तापूर (५३०८०६)	१०६६७०/- (अक्षरी रक्कम एक लक्ष सहा हजार सहाशे सत्तर रुपये)
२	भडकुंभा (५३०८३५)	६७४३०/- (अक्षरी रक्कम सदुसट हजार चारशे तीस रुपये)

वाशिम :
दिनांक १८ जुलै, २०२५.

सुदाम जाधव,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
वाशिम.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.